## प्रसिध्दी पत्रक

दिनांक : २२/१०/२०२४

### पोलीस स्टेशनचे सपोनि दिघे व पोलीस हवालदार जोगे यांनी खाजगी इसमा कडुन फोन पे वर २०,०००/— रूपयांची लाच स्विकारली म्हणुन लाचलुचपत प्रतिबंधक विभाग नांदेड यांचे जाळ्यात

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड युनिट |
| पोलीस ठाणे | मरखेल |
| गुन्हा रजिस्टर नंबर | गुरनं २३४/२०२४ कलम ७, ७ अ, १२ भ्र.प्र.अ १९८८ |
| गुन्हा दाखल दिनांक व वेळ | दिनांक २१.१०.२०२४ रोजी १९.०३ वाजता |
| आरोपी लोकसेवक यांचे नाव, हुद्दा व पत्ता | १) संकेत वसंतराव दिघे, वय ४४ वर्षे, व्यवसाय नोकरी, पद – सहा. पोलीस निरीक्षक, रा. मरखेल कॉलनी ता. देगलुर जि. नांदेड २) दिपक प्रल्हादराव जोगे, वय ५४ वर्षे, व्यवसाय नोकरी, पद – पोलीस हवालदार ब.नं. २१२५ रा. देगलुर ता. देगलुर जि. नांदेड दोघे नेम. पो.स्टे. मरखेल,ता. देगलुर, जि. नांदेड ३) शरद रामदास शेरिकर, खाजगी इसम. |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | ४०,०००/— रू. |
| लाच स्विकारली रक्कम | २०,०००/— रू. |
| थोडक्यात माहिती | तक्रारदार यांची मौ. मरतोळी, ता. देगलुर येथील शेत गट क्र. १०१/१ चे शिवारात १ हेक्टर वडीलोपार्जीत शेती आहे. नमूद शेतीमध्ये त्यांचे शेताचे शेजारी शेत असलेले लोक वारंवार अडथळा आणत असल्याने त्यांनी मा. दिवाणी न्यायालय, देगलूर यांच्याकडून मनाई हुकूम प्राप्त करून घेतला होता. नमूद दिवाणी न्यायालयाचे मनाई हुकूम घेवून तक्रारदार यांनी पो.स्टे. मरखेल येथे जावून त्यांचे शेता शेजारील लोकांवर प्रतिबंधक कारवाई करणेबाबत सपोनि संकेत दिघे यांना विनंती केली. त्यावरून सपोनि दिघे यांनी तक्रारदार यांना त्यांचे शेता शेजारील लोकांवर प्रतिबंधक कारवाई करण्यासाठी ४०,०००/— रूपये लाचेची मागणी केली. त्यानंतर बीट जमादार पोह/दिपक जोगे यांनी तक्रारदार यांना सपोनि दिघे साहेबांनी ४०,०००/— रूपये सांगितले आहे, तुम्ही पैसे द्या असे म्हणुन गुन्हयास प्रोत्साहन दिले. त्यावेळी पोह/दिपक जोगे व तक्रारदार यांच्यात तडजोड होवून पोह/जोगे यांनी मागितलेल्या ४०,०००/— रूपया पैकी २०,०००/— रूपये स्विकारण्याचे मान्य करून खाजगी इसम शरद रामदास शेरिकर यांचे मोबाईलचे फोन पे वर पाठविण्यास तक्रारदार यांना भाग पाडले.<br>तरी यातील तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारी अर्जाचे चौकशीमध्ये सपोनि श्री संकेत दिघे, पोह/दिपक प्रल्हाद जोगे यांनी तक्रारदार यांना त्यांचे शेता शेजारील लोकांवर दिवाणी न्यायालयाचे मनाई हुकूमाचे आदेशावरून प्रतिबंधक कारवाई करण्यासाठी ४०,०००/— रूपये लाचेची मागणी करून २०,०००/— रूपये खाजगी इसमाचे मोबाईल फोन पेवरून स्विकारले म्हणून गुन्हा दाखल करण्यात आला आहे |
| मार्गदर्शक | श्री. संदीप पालवे, पोलीस अधीक्षक, लाच लुचपत प्रतिबंधक विभाग नांदेड परीक्षेत्र नांदेड |
| पर्यवेक्षक अधिकारी | श्री. प्रशांत पवार, पोलीस उप अधीक्षक, लाच लुचपत प्रतिबंधक विभाग नांदेड |
| गुन्हयाचा तपास | श्रीमती जमीर नाईक, पोलीस निरीक्षक, लाप्रवि नांदेड, हे करीत आहे. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाशी संपर्क साधावा.

| संपर्क पत्ता :– लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड, नागार्जुनसागर बिल्डील स्नेहनगर/श्रीनगर नांदेड | |
|---|---|
| संपर्क कमांक :– 02462–253512<br>टोल फ्री कमांक– 1064 | ऑनलाईन तकार ॲप्लीकेशन acbmaharashtra.net |
| मा. पोलीस अधीक्षक 9545531234 | पोलीस उपअधीक्षक 9870145915 |
| ई–मेल आयडी<br>spacbnanded@mahapolice.gov.in | ई–मेल आयडी<br>dyspacbnanded@mahapolice.gov.in |
| FACEBOOK – Dysp Acb Nanded | TWITTER - @ACBnanded |
| INSTAGRAM – acb_nanded | |

पोलीस उपअधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड

Scanned with CamScanner